दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

दिवा न्यूज

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-४५ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ५ जून २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# बदलत्या दिव्याला शिंदेंची साथ! बुधवारी मुख्यमंत्री दिव्यात!

## लोकार्पण

नवीन मुख्य जलवाहिनी लोकार्पण (पाणी प्रकल्प योजना २२१ करोड)

दिवा-आगासन मुख्य रस्ता (६६ कोटी)

आरोग्यकेंद्र (मातोश्री नगर, दातिवली, दिवा पूर्व) (१५ लक्ष)

व्यायामशाळा, दातिवली गाव (२५ लक्ष)

खुला रंगमंच दातिवली गाव (४० लक्ष)

शाळा क्र.८० साबेगाव (१.२५ कोटी)

## भूमिपूजन

आगरी-कोळी-वारकरी भवन (रुणवाल सिटी, बेतवडे) (१५ कोटी)

पॅकेज नंबर ३९१ (९५ कोटी)

आगासन-देसाई खाडी पूल (६० कोटी)

सामाजिक भवन (धर्मवीर नगर) (५० लक्ष)

दातिवली तलाव सुशोभिकरण (४.७३ कोटी)

दिवा-शिळ रोड (२० कोटी)

पुरातत्व खिडकाळेश्वर मंदिर परिसर (१०.१८ कोटी)

देसाई गाव तलाव (१.७५ कोटी)

पॅकेज नंबर २१४ (५० कोटी)



(सविस्तर वृत्त पान ३ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ५ जून २०२३





## खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२३ स्पर्धेत चार पदके

**ठाणे:** लखनौ येथे २९ ते ३१ दरम्यान पार पडलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२३, स्पर्धेत ठाण्याच्या खेळाडुंनी दोन सुवर्णपदकांसह एकूण चार पदकांवर नाव कोरले आहे. तर वैयक्तिक स्पर्धांमध्ये दोन सुवर्णपदके आणि स्पर्धेत ३ पदके जिंकणारी निधी ही एकमेव खेळाडू ठरली आहे.

निधी सिंग हीने ४०० मीटर, ४०० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्ण आणि ४ १०० मीटर रिलेमध्ये कांस्य पदक मिळवले. निधीने ४०० मीटरमध्ये वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली. तर सानिका नाटे हीने ४ १०० मीटर रिलेमध्ये कांस्यपदक मिळवले. सानिका हीने शर्यतीला उत्कृष्ट सुरुवात करून दिली. आकांक्षा गावडे हिने ४ ४०० मीटर रिलेच्या पहिल्या लेगमध्येही उत्कृष्ट कामगिरी केली. तिने वैयक्तिक सर्वोत्कृष्ट कामगिरी केली. निधी, सानिका आणि आकांक्षा यांनी मुंबई विद्यापीठाला द्वितीय उपविजेते बनवण्यात योगदान दिले. विशेषतः निधीचे योगदान मोठे होते.

## विविध मागण्यांसाठी किसान सभेचा ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**ठाणे:** वन अधिकार कायद्याची न्याय अंमलबजावणी करा, कसत असलेल्या जमिनीचे संपूर्ण क्षेत्र कसणाऱ्या शेतकऱ्याच्या नावे करा,शेतीसाठी शेतकऱ्यांना कर्ज, विमा, नुकसान मदत, शासकीय विकास योजनेचा लाभ देण्यात यावा आदी विविध मागण्यांसाठी बुधवारी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी शेकडोंच्या संख्येने शेतकरी बांधव सहभागी झाले होते.

ठाणे - पालघर जिल्ह्यातील शेतकरी, आदिवासी, श्रमिकांचे विविध प्रश्न अधिकाधिक गंभीर होत चालले आहेत. हे प्रश्न सुटावेत यासाठी यापूर्वी देखील शेतकरी, आदिवासी, श्रमिकांचे विविध प्रश्नांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या महाराष्ट्र राज्य कमिटीच्या नेतृत्वाखालील मार्च २०२३ मध्ये दिंडोरी ते वशिंड असा किसान लाँग मार्च काढण्यात आला होता. तर, एप्रिल महिन्यात अकोले ते लोणी असा भव्य पायी मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी राज्य शासनाने लेखी स्वरूपात मागण्या मान्य केल्या होत्या. मात्र, अद्याप त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे मान्य मागण्यांची तत्काळ अंमलबजावणी करावी, ठाणे व पालघर जिल्ह्यातील शर्मिकांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवावेत यासाठी मोर्चा बुधवार ३१ मे रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यात मोठ्या प्रमाणात जिल्ह्यातील शेतकरी, आदिवासी, श्रमिक सहभागी झाले होते.

## ठाण्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवींवर नर्मदेचा जलाभिषेक

**ठाणे :** ठाण्यातील मासुंदा तलाव परिसरात असलेल्या अहिल्यादेवी यांच्या मूर्तीवर बुधवारी सकाळी नर्मदेच्या जलाने अभिषेक करण्यात आला. आहिल्यादेवी यांचे वंशज इंदोरच्या होळकर संस्थानचे श्रीमंत राजे यशवंतराव होळकर यांनी देशभरातील अहिल्यादेवी यांच्या प्रतिमांचे नर्मदेने जलाभिषेक व्हावा, यासाठी नर्मदा तीर्थ पाठविण्यात आले होते. देशभरातल्या प्रमुख मंदिरांच्या जिर्णोद्धार करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची बुधवारी २९८ वी जयंती यंदा वेगळ्या पद्धतीने साजरी झाली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## यूपीएसएसी स्पर्धा परीक्षेदिवशी सी.डी. देशमुख प्रशासकीय संस्थेने राबविले 'जनजागृती महाअभियान'

### एकाच दिवशी २७४९ यूपीएससी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**ठाणे : केंद्रीय लोकसेवा आयोग पूर्व परीक्षा नुकतीच ठाणे, मुंबई, नवी मुंबईतील विविध परीक्षाकेंद्रावर पार पाडली. या परीक्षेदरम्यान यूपीएससी अभ्यासक्रमाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जगजागृती व्हावी यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय संस्थेच्या वतीने रविवार २८ मे २०२३ रोजी ठाणे व नवीमुंबई येथील १२ परीक्षा केंद्राबाहेर तर मुंबईतील ४ परीक्षा केंद्राबाहेर ऐतिहासिक असे ''जगजागृती महाअभियान''राबविले. या महाअभियानाच्या माध्यमातून सी.डी देशमुख संस्थेने एकूण २७४९ यूपीएससी स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला असून, या महाअभियानास ठाणे, मुंबई, नवी मुंबईतील विद्यार्थी व पालक यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.**

ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून यूपीएससी स्पर्धा परीक्षेबाबत राबविलेल्या महाअभियानाचे ठाणे महानगरपलिकेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. ठाणे महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त अभिजित बांगर यांनी दिलेल्या निर्देशान्वये, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, उप आयुक्त अनघा कदम व संचालक महादेव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष ''जनजागृती महाअभियान'' राबविण्यात आले, ज्या अंतर्गत ठाणे व नवी मुंबई येथील एकूण १२ परीक्षा केंद्राबाहेर संस्थेची माहिती देणेकरिता संस्थेचे प्रतिनिधी तसेच ठाणे महानगरपालिकेचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. तसेच मुंबई येथे ४ परीक्षा केंद्राबाहेर संस्थेचे बॅनर लावण्यात आले होते. सदर ''जनजागृती अभियाना''द्वारे एकूण २७४९ विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधला असून, त्यांना संस्थेची संक्षिप्त माहिती दिलेली आहे. त्या अनुषंगाने एकूण ४३० नवीन विद्यार्थ्यांनी संस्थेच्या पूर्वपरीक्षा २०२३ करीता नाव नोंदणी केलेली आहे.

प्रत्येक परीक्षा केंद्रात अंदाजे ४५० ते ६०० विद्यार्थी परीक्षा देण्याकरीता आले होते, त्यांच्या पालकांशी व विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यात आला, व ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेची, संस्थेच्या प्रवेश परीक्षा (चाचणी परीक्षा) २०२३ बाबत माहिती तसेच माहितीपत्रकाचे वाटप करणे, केंद्रीय लोकसेवा आयोग मुख्य परीक्षेकरीता संस्थेच्या मार्गदर्शन वर्ग व सराव परीक्षा, व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण वर्ग, संस्थेचे पुढील नियोजित कार्यक्रम आणि यशस्वी वाटचालीबाबत माहिती देण्यात आली. अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी सदर ''जगजागृती अभियानाचे'' कौतुक केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# दिव्यात शासकीय रुग्णालयाच्या भूसंपादनसाठी ५८ कोटींच्या निधीची तरतूद हे भाजपच्या जनआंदोलनाचे यश

## - ज्योती पाटील



**दिवा:-** पाच लाख लोकसंख्येच्या दिवा शहराला स्वतंत्र रुग्णालय मिळावे यासाठी दिवा भाजपच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या जनआंदोलनाला यश आल्याची प्रतिक्रिया दिवा भाजपच्या महिला मंडळ अध्यक्ष ज्योती पाटील यांनी दिली आहे.

दिव्यासाठी स्वतंत्र रुग्णालय होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने भूसंपादनासाठी ५८ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केल्यानंतर दिवा शहरात शासकीय रुग्णालय होण्याच्या दृष्टीने प्राथमिक हालचाली सुरू झाल्याचे मत ज्योती पाटील यांनी व्यक्त केले असून ही प्राथमिक सुरुवात आहे असेही त्यांनी म्हटले आहे. जोपर्यंत दिवा शहरात सुसज्ज असे रुग्णालय उभे राहत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील असेही ज्योती पाटील यांनी आवर्जून सांगितले आहे. पाच लाख लोकसंख्येच्या दिवा शहराला स्वतंत्र रुग्णालय असावे असा विचार याआधी झाला नाही. भारतीय जनता पार्टीने दिवा शहरातील महिला व नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन केल्यानंतर शासनाने या विषयाची गंभीर दखल घेतली.

शासनाचे लक्ष वेधण्याचे काम भारतीय जनता पार्टी दिवा शहर व येथील हजारो नागरिकांनी केलेल्या आंदोलनामुळे शक्य झाले. भारतीय जनता पार्टी दिवा शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी कायमच आवाज उठवत राहिली असे स्पष्ट मत यावेळी ज्योती पाटील यांनी व्यक्त केले.दिवा शहराच्या स्वतंत्र रुग्णालयासाठी ५८ कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल ज्योती पाटील यांनी महाराष्ट्र भाजपचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री रवींद्र चव्हाण,ज्येष्ठ आमदार संजय केळकर, ठाणे जिल्हा अध्यक्ष निरंजन डावखरे यांचे आभार मानले आहेत.

# कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रात सत्ता बदल होणार नाही

## - मंगल प्रभात लोढा



**ठाणे:** कर्नाटक निकालाबाबत बोलले जातेय,पण त्याचवेळी उत्तरप्रदेशाचा ही निकाल आला. तेथे १०० टक्के निकाल आमच्या बाजूने लागून त्याबाबत कोणी बोलत नाही. कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रात सत्ता बदल असे काहीही होणार नाही. कारण , महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास असल्याचे केंद्रीय पर्यटन, कौशल्य विकास, रोजगार आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी ठाण्यात बुधवारी झालेल्या एका पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला. याचदरम्यान ठाणे जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी यापूर्वी २० कोटी निधी पेक्षा जास्त निधी दिला असून यंदा विशेष योजना राबविण्यात येणार असून त्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल असेही त्यांनी म्हटले आहे. तसेच लोढा यांनी फेरीवाला योजनेबाबत बोलताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता टीका केली. तर खासदार संजय राऊत यांच्याकडून केलेल्या आरोपांना उत्तर देणे त्यांनी प्रामुख्याने टाळले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला ९ वर्षे पूर्ण झाले आहेत. भाजपातर्फे राबविण्यात येणाऱ्या मोदी९ कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी कार्याची माहिती देण्यासाठी भाजपाच्या ठाणे खोपट येथील कार्यालयात राज्याचे पर्यटन, कौशल्य विकास, रोजगार आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभातजी लोढा यांनी पत्रकार परिषद झाली. या वेळी आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर, आमदार मंदा म्हात्रे, आमदार गीता जैन, माजी खासदार संजीव नाईक, भाजपाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, प्रदेश प्रवक्ते सागर भदे आदींची उपस्थिती होती.

यावेळी पर्यटन मंत्री लोढा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून समाजातील प्रत्येक घटकाला दिलासा दिला गेला. कोरोना आपत्तीत संकटात कोणीही उपाशी राहू नये, यासाठी ८० कोटी गरीबांना मोफत अन्नधान्य दिले गेले. तर कोरोनाला हरविण्यासाठी २२० कोटी डोस मोफत दिले गेले. ग्रामीण भागातील ९ कोटी ६० लाख कुटुंबांपर्यंत मोफत गॅस, आयुष्मान भारत योजनेतून तब्बल पाच कोटी नागरिकांवर मोफत उपचार करण्यात आले. देशातील एक लाख फेरीवाल्यांना कर्ज उपलब्ध करून दिले गेले. समाजातील वंचित घटकांसाठी साडेसात हजार कोटींचे कर्जवाटप करण्यात आले. प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत ५ हजार १८२ कोटी रुपये, लाभार्थींच्या थेट खात्यात २९ लाख कोटी रुपये देण्यात आले.

# बुधवारी मुख्यमंत्री दिव्यात

## विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन!

## दिवा शिवसेनेच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा होणार नागरी सत्कार

**दिवा:** शहरात झालेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण व प्रस्तावित विकास कामांचे भूमिपूजन बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दिवा येथे पार पडणार आहे.

यावेळी दिवा शिवसेनेच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व स्थानिक खासदार श्रीकांत शिंदे यांचा नागरी सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेनेच्या वतीने देण्यात आली आहे. बुधवारी ७ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजता धर्मवीर नगर येथे हा कार्यक्रम पार पडणार असून या कार्यक्रमाला शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. मुख्य जलवाहिनीचे लोकार्पण,दिवा आगासन मुख्य रस्ता, आरोग्य केंद्र, व्यायाम शाळा दातिवली गाव, खुला रंगमंच दातिवली गाव,पॅकेज नंबर २०० ४ ,शाळा क्रमांक ८० साबेगाव या कामांचे लोकार्पण होणार असून आगासन देसाई खाडी पूल, आगरी कोळी व वारकरी भवन, सामाजिक भवन धर्मवीर नगर,पॅकेज नंबर ३९१, दातिवली तलाव सुशोभीकरण, दिवा शील रोड, पुरातत्व खिडकालेश्वर मंदिर परिसर, देसाई गाव तलाव या विकास कामांचे भूमिपूजन यावेळी मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. या सोहळ्याला दिवा शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शहर प्रमुख रमाकांत मढवी,उपशहर प्रमुख शैलेश पाटील, आदेश भगत,अमर पाटील,दिपाली उमेश भगत, साक्षी रमाकांत मढवी, उमेश भगत, निलेश पाटील, गुरुनाथ पाटील व भालचंद भगत यांनी केले आहे.

# दुरुस्त केलेल्या जलस्त्रोते पुन्हा नादुरुस्त होणार नाहीत, याची काळजी घ्या

## केंद्रीय निती आयोगाच्या सदस्या सिंगला यांची सूचना

### जिल्ह्यातील जलशक्ती अभियानाच्या कामांचा त्यांनी घेतला आढावा




**ठाणे:** पाणलोट विकास, जलसंधारणाची कामांमुळे तसेच पर्जन्य जल पुनर्भरणामुळे व तलावांमधील गाळ काढल्यामुळे किती पाणी साठा होतो, भूजल पातळी वाढली आहे का याची माहिती ठेवावी. तसेच दुरुस्त केलेल्या जलस्त्रोते पुन्हा नादुरुस्त होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. प्रत्येक कामांचे जिओ टॅगिंग करावे. अशा सूचना बुधवारी केंद्रीय नीती आयोगाच्या सदस्या जागृती सिंगला यांनी दिल्या.

जिल्ह्यातील जलशक्ती अभियान व राष्ट्रीय जल मिशनअंतर्गत गेल्या वर्षभरात झालेल्या व यावर्षी सुरू असलेल्या जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण, पारंपारिक आणि इतर जलकुंभ आणि टाक्यांचे नूतनीकरण, संरचनेचा पुनर्वापर आणि पुनर्भरण, गाळ काढणे, पाणलोट विकास, सघन वनीकरण आदी कामांचा आज केंद्रीय निती आयोगाच्या सदस्या सिंगला यांनी आढावा घेतला.ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहात पार पडलेल्या आढावा बैठकीस जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, केंद्रीय पथकातील शास्त्रज्ञ वैष्णवी परिहार, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. भाऊसाहेब दांगडे, मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त दिलीप ढोले, उपजिल्हाधिकारी दीपक चव्हाण, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रवीण खेडकर, ठाण्याचे उपवनसंरक्षक संतोष सस्ते, शहापूरचे उपवनसंरक्षक सचिन रेपाळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दीपक कुटे, जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अर्जून गोळे, मृद व जलसंधारण अधिकारी दिलीप जोकार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात २०२३ मध्ये जलसंधारण व जलपुनर्भरणाची १ हजार १९१ कामे, पारंपारिक आणि इतर जलकुंभ आणि टाक्यांचे नूतनीकरणाची १७९ कामे, जलसंरचनेचे पुनर्वापर व पुनर्भरणाची ३२० कामे, पाणलोट विकासाची १५२ कामे सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मृद व जलसंधारण विभागमार्फत २०२३ या वर्षात चेक डॅमची एकूण १९ कामे तर लघु पाटबंधारे विभागामार्फत २४ कामे हाती घेण्यात आली आहेत. तर, अमृत सरोवर योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागामार्फत घेण्यात आलेल्या ७५ कामांपैकी ४६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पाणीपुरवठा विभागामार्फत पावसाच्या पाण्याचे पुनर्भरणाची एकूण ३९ कामे हाती घेण्यात आली असून त्यातील २४ कामे पूर्ण झाली आहेत. जलजीवन मिशनअंतर्गत जुन्या योजनांची दुरुस्ती व नवीन योजनांची अशी एकूण ७०० कामे हाती घेण्यात आली असून त्या कामांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. ही सर्व कामे डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी जिंदल यांनी जिल्ह्यातील कामांची माहिती दिली व या वर्षीचे नियोजन सांगितले.

## प्रधानमंत्री किसान योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी व बँक खाते आधार संलग्न करावे – कृषि सहसंचालक अंकुश माने




**ठाणे :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पी एम किसान) अंतर्गत १४ व्या हप्त्याचे वितरण जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. केंद्र शासनाने योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थींचे बँक खाते आधार संलग्न करणे, ई केवायसी प्रमाणीकरण करणे तसेच भूमी अभिलेख नोंदणीप्रमाणे माहिती अद्यावत करणे या बाबी बंधनकारक केलेल्या आहेत. लाभार्थी शेतकऱ्यांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन कोकण विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी केले आहे.

राज्यात सद्य:स्थितीत जवळपास ११ लाख व १९ लाख लाभार्थींची अनुक्रमे बँक खाते आधार संलग्न करणे व ई केवायसी करणे प्रलंबित आहेत. ज्या लाभार्थींचे ई केवायसी व बँक खाती आधार संलग्न झाली नाहीत, त्यांना योजनेचा पुढील हप्ता अदा होणार नाही. केंद्र शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे राज्यात १ मे पासून जिल्हाधिकारी महोदयांच्या नियंत्रणाखाली गावपातळीवर यासंदर्भात मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये लाभार्थ्यांची ई-केवायसी करण्यासाठी लाभार्थ्यांने प्रधानमंत्री किसान पोर्टलवरील फार्मर कॉर्नरमधील ई केवायसी ओटीपी आधारित सुविधेद्वारे अथवा सामायिक सुविधा केंद्रामध्ये (सीएससी) अथवा पी एम किसानच्या नवीन ॲपद्वारे चेहरा ओळख (फेस डिटेक्शन) माध्यमातून ई-केवायसी प्रमाणीकरण करावे. तसेच संबंधित लाभार्थ्याला जर बँक खाते आधार संलग्न करायचे असेल तर त्याने त्यांच्या बँकेत जाऊन बँक खात्यास आधार संलग्न करावा किंवा पोस्टमास्तर यांच्यामार्फत इंडिया पोस्ट पेमेंट बँक खाते उघडावे. लाभार्थ्याचे जर भूमी अभिलेख नोंदणीप्रमाणे अद्यावतीकरण करायचे असल्यास त्याने आवश्यक त्या कागदपत्रांच्या आधारे गावच्या तलाठी अथवा संबंधित तहसील कार्यालयास संपर्क साधून सर्व बाबींची पूर्तता करावी व १४ व्या हप्त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषि सहसंचालक माने यांनी केले आहे.

## मुलभुत सोईसुविधांसाठी महापालिकेकडे निधी नसल्याने दक्ष नागरीकाचे भीक मांगो आंदोलन

**ठाणे :** एक एक रुपयाचे महत्व समजत आहे. मात्र सुशोभिकरणाच्या नावाखाली कोट्यावधींचा निधी वाया घालविला आहे. परंतु मुलभुत सोईसुविधांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करत ठाणे महापालिका मुख्यालयासमोर दक्ष नागरीक संगम डोंगरे यांनी गुरुवारी भिक मागो आंदोलन केले. तर महापालिकेला जाग आली नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल असा इशाराही त्यांनी दिला आहे.

शहर हे स्मार्टसिटीच्या दिशेने जात असतांना शहराच्या मुलभुत सोईसुविधांसाठी महापालिकेकडे निधी नसल्याचे महापालिका सांगत आहे. महापालिका रस्ते असतील, शहर सौंदर्यीकरणाच्या नावाखाली कोट्यावधींचा निधी खर्च केला जात आहे. परंतु उद्यानाची दुरावस्था झालेली असतांना त्यासाठी महापालिकेकडे निधी नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रभागातील इतर महत्वाच्या सोई सुविधांसाठी देखील निधी नसल्याचेही महापालिका सांगत आहे. त्यामुळे मुलभुत सोई सुविधांसाठी महापालिकेला निधी मिळावा यासाठी हे भीक मांगो आंदोलन करण्यात आल्याची माहिती डोंगरे यांनी दिली. हा निधी आता महापालिकेला दिला जाणार आहे. जेणेकरुन महापालिका या पैशातून तरी मुलभुत सोईसुविधांसाठी पैसे करतील अशी अपेक्षा आहे. मात्र तरी सुध्दा महापालिकेला जाग आली नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ५ जून २०२३


# मुंब्र्यात तंबाखूविरोधी दिनी एसीपीची अंमली पदार्थ विरोधी रॅली

## रॅलीत शेकडो तरूणांचा सहभाग




**ठाणे :** मुंब्रा शहरात काही समाजकंटकांच्या मार्फत अंमली पदार्थांची विक्री करण्यात येत आहे. त्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून ''अंमली पदार्थ विरोधी'' रॅली अमृत नगर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, मुंब्रा पोलीस ठाणे अशी काढण्यात आली होती. या रॅलीत लहान मुले, तरूण, तरूणी,महिला, पुरुष, डॉक्टर्स, धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी अनेक तरूण-तरूणींनी मुंब्रा, कौसा भागात अंमली पदार्थ विरोधी मोहीम आखण्याचा निर्धार व्यक्त केला.

गेल्या काही दिवसांपासून मुंब्रा, कौसा भागात अंमली पदार्थांची रेलचेल वाढली आहे. समाजकंटकांकडून तरूणांना अंमली पदार्थांचे व्यसन लावण्यात येत आहे. या प्रकारामुळे सामान्य घरातील तरूण गुन्हेगारीकडे वळत आहेत. त्यांना यातुन बाहेर काढण्यासाठी मुंब्र्यात अंमली पदार्थ विरोधी मोहीम सुरू केली असून त्याचाच एक भाग म्हणून तंबाखू विरोधी दिनाच्या अनुषंगाने त्यांनी बुधवारी ही रॅली काढली.

तरूणांनी हातात,'' अंमली पदार्थ सेवन करणार नाही; करू देणार नाही; नशेखोरी बंद करो, '' असा संदेश देणारे फलक घेतले होते.

यावेळेस मर्जिया पठाण म्हणाल्या की, अंमली पदार्थांची विक्री करणार्या समाजकंटकांना ठाणे जिल्ह्यातून तडीपार करण्यात यावे. तसेच, ज्या दुकानातून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री केली जात आहे. त्या दुकानांवर कारवाई करण्यात यावी. यासाठी आम्ही पोलीस प्रशासनाला विनंती केली आहे. पण, पालकांनीही आपल्या पाल्यांवर लक्ष ठेवले पाहिजे. कारण, पालकांनी आपल्या मुलांना चांगली शिकवण दिली. तर नक्कीच चांगली आणि सुजाण पिढी घडविली जाईल.

याप्रसंगी मर्जिया शानू पठाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलिसांना निवेदन देऊन अंमलीपदार्थ मुक्त मुंब्रा करण्याची विनंती केली. या रॅलीत ॠता आव्हाड, माजी विरोधी नेते शानू पठाण, शाकिर शेख, महेशर शेख, साकिब दाते, नाजिम खान बॉबेरे , मौलाना तकी, मौलाना शाहनवाजू यांच्यासह अनेक मुल्ला-मौलवी सहभागी झाले होते.

---

# बेकायदेशीररित्या वाहतूक होणारे १ कोटी ९५ लाखांचे मद्य जप्त

### राज्य उत्पादन शुल्क कोकण विभागाच्या ठाणे पथकाची कारवाई

## दोघेजण जेरबंद करण्यात यश

**ठाणे:** पनवेल तालुक्यातील गोवा मुंबई नॅशनल हायवे परिसरातील कल्हेगाव येथे बेकायदेशीररित्या गोवा राज्यात निर्मित व विक्रीस परवानगी असलेला व महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेला बनावट विदेशी मद्याचा साठा सुमारे एक कोटी १८ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक, कोकण विभागाच्या ठाणे पथकाला यश आले आहे. तसेच या कारवाईत कर्नाटक येथील राजशेखर सोमशेखर परगी ( ४१) आणि खजाहुसेन दवलसाब हित्तलमनी (५८) या दोघांना अटक ही केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी अवैध-नकली - परराज्यातील मद्याविरुध्द कारवाई करण्यासाठी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने गोवा मुंबई हायवे वरुन परराज्यातील अवैध मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार ठाणे विभागाचे अधीक्षक निलेश सांगडे यांच्या आदेशाने निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक व त्यांच्या सहकारी स्टाफने पनवेल तालुक्यातील गोवा मुंबई नॅशनल हायवे येथील कल्हेगाव येथे २ जून २०२३ रोजी सापळा रचला होता. त्यावेळी, कंटेनर च्या केलेल्या तपासणीत मोठया प्रमाणात गोवा राज्यात निर्मित व विक्रीस परवानगी असलेला व महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेले बनावट विदेशी मद्याचे १५५७ बॉक्स आढळून आला. त्या मद्यासह एक मोबाईल व एका वाहन असा एकूण १ कोटी १८ हजार ९४ हजार ३६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली.

ही कारवाई दुय्यम निरीक्षक संदीप जरांडे व दुय्यम निरीक्षक विजय धुमाळ तसेच जवान हनुमंत गाढवे, नारायण जानकर, केतन वझे, वैभव वामन, संपत वनवे, नानासाहेब शिरसाठ यांनी पार पाडली. तर दुय्यम निरीक्षक संदीप जरांडे, हे पुढील तपास करत आहेत.

---

# अन्यथा महापालिकेच्या विरोधात हल्लाबोल आंदोलन करू

## शहर काँग्रेसचा इशारा

**ठाणे :** ठाणे महापालिकेने शहरातील विविध कामांबाबत ३१ मे ची डेड लाईन दिली होती,मात्र महापालिकेकडून दिशाभुल करणारी माहिती दिली जात असल्याचा आरोप ठाणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

तर, येत्या काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला असतांना नाले सफाईची कामे ५० टक्केच झाले असून सार्वजनिक शौचालयांची अवस्था दयनीय आहे. तर रस्त्यांची कामे देखील अर्धवट आहेत. गटार, पायवाटांची अवस्था दयनीय आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात ठाणेकरांचे हाल होणार असल्याचा दावाही चव्हाण यांनी केला. परंतु यावर तोडगा निघाला नाही तर पुढील आठवड्यात महापालिकेवर हल्ला बोल आंदोलन केले जाईल असा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

पत्रकार परिषदेत, चव्हाण यांनी शहरातील विविध प्रभागातील नालेसफाई आणि शौचालयांची कशी अवस्था आहे, याचे फोटोद्वारे पुरावेच सादर करुन एक प्रकारे महापालिकेने आव्हान दिले आहे. येत्या काही दिवसात पावसाळा सुरु होणार आहे. परंतु शहरात सुरु असलेली रस्त्यांची कामे अवघी ५० टक्के झाली असल्याचा दावा त्यांनी केला आहे. आयुक्तांनी ३१ मे पूर्वी कामे पूर्ण करणार असल्याचा दावा केला होता. परंतु त्यांचा दावा फोल ठरला असल्याचेही ते म्हणाले. त्यामुळे आहे ती कामे थांबून रस्ते सुस्थितीत कसे राहितील याचा विचार पालिकेने करावा असेही त्यांनी सांगितले. नाले सफाईची कामे पूर्ण करावीत, शौचालयांची अवस्था दयनीय असून कुठे दरवाजे नाहीत, कडी-कोयंडा नाही अशी अवस्था आहे. त्यामुळे जो निधी आणलेला आहे, तो शौचालये, गटार पायवाटांकडे वळवावा अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. येत्या १० दिवसात या समस्या सोडविण्यात याव्यात अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरुन पाहणी दौरा करुन पालिकेचे पितळ उघडे पाडू आणि महापालिकेच्या विरोधात हल्लाबोल आंदोलन करु असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. महापालिका आयुक्तांनी रामदास पाध्येंचा बोलका बाहुला होऊ नये अशी विनंती देखील चव्हाण यांनी केली.

अनधिकृत बांधकामांवर कितीही शेरे मारले तरी देखील शहरात ही बांधकामे आजही सुरुच असल्याचा आरोपही त्यांनी केला. सर्वांची कामे आयुक्तांनी करावीत, सत्ताधार्‍यांची कामे अधिक करीत असतांना जनतेची कामे देखील करावीत अशी सुचनाही त्यांनी केली. रोगराई बाबत उपाय योजना करण्यात याव्यात अशी मागणही त्यांनी केली.

# मोठागाव रेल्वे उड्डाणपुलासाठी १६८ कोटी मंजूर

**कल्याण डोंबिवली महापालिकेचा हिस्सा राज्य सरकारने उचलला...**

**खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश...**

**ठाणे:** कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्र आणि आसपासच्या वाहतुकीचा चेहरामोहरा बदलणाऱ्या कल्याण रिंग रोडच्या उभारणीचे काम युद्धपातळीवर सुरू असतानाच माणकोली मोठागाव येथील उल्हास नदीवरील पूलही अंतिम टप्प्यात आहे. याच पुलाचा पुढचा भाग असलेला मोठागाव परिसरातून जाणाऱ्या रेल्वे मार्गावर उड्डाणपूल उभारण्याच्या कामी कल्याण डोंबिवली महापालिकेला द्यावा लागणाऱ्या १६८ कोटींच्या हिस्साचा भार राज्य सरकारने उचलला असून त्यासाठीचा निधी मंजुर केला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शिवसेना पदाधिकारी दिपेश म्हात्रे आणि स्थानिकांच्या मागणीनंतर या पुलाच्या कामासाठी पाठपुरावा केला होता. तर त्यांच्याच पाठपुराव्यामुळे नगरविकास विभागाने निधी मंजुर केला असून स्थानिकांनी शिंदे यांचे आभार मानले आहेत.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्राला गतीमान पर्याय देण्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून कल्याण रिंगरोडची उभारणी केली जाते आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रिंगरोडचे काम प्रगतीपथावर असून त्यातले महत्वाचे टप्पे पूर्ण होत आहेत. काही दिवसांपूर्वी मोठागाव ते दुर्गाडी या टप्प्याची निविदा जाहीर होऊ कामाला सुरूवात झाली. तर या मार्गाला जोडला जाणारा माणकोली मोठागाव यादरम्यान उल्हास नदीवर पुलाची उभारणी वेगाने सुरू असून ती अंतिम टप्प्यात आली आहे. या पुलाच्या उभारणीनंतर मोठागाव हा भाग वाहतुकीच्या केंद्रस्थानी येणार आहे. याच पुलाच्या पुढील जोडरस्त्याला मोठागाव भागात रेल्वे मार्गिका धेदून जाते. या ठिकाणी पूल उभारणीची स्थानिक शिवसेना माजी नगरसेवक दिपेश म्हात्रे तसेच स्थानिक पदाधिकारी आणि नागरिक सातत्याने करत होते. त्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट या कामाला गती देण्याची मागणी केली होती. या कामात कल्याण डोंबिवली महापालिकेला आपला हिस्सा द्यावा लागणार होता. या कामासाठी आवश्यक भूसंपादन आणि पुनर्वसन मोबदला देण्याची पालिकेला १६८ कोटींची आवश्यकता होती. मात्र कल्याण डोंबिवली महापालिकेची आर्थिक स्थिती पाहता या निधीसाठी कल्याण डोंबिवली महापालिकेला आर्थिक मदतीची गरज होती. हा हिस्सा राज्य शासनाने उचलावा अशी मागणी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली होती. त्यासाठी कल्याण डोंबिवली महापालिकेचे आयुक्त डॉ. भाऊसाहेब दांगडे यांनीही पाठपुरावा केला. अखेर राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने नुकताच या पालिकेच्या हिश्यापोटी १६८ कोटी रूपये देऊ केले आहेत. यात रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन करण्यासाठी ५० टक्के हिस्सा अर्थात ३० कोटी रूपये मंजुर केले असून त्याअंतर्गत बाधितांच्या पुनर्वसनासाठी रूपये १३८ कोटी रूपये मंजूर केले आहे. राज्य सरकारने एकूण १६८ कोटी रूपये मंजुर केले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या तिजोरीवरचा आर्थिक भार हलका करण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाचे डोंबिवलीकरांच्या वतीने आणि स्थानिक मोठागाव ग्रामस्थांच्या वतीने आभार मानले जात आहेत. तर कल्याण डोंबिवली महापालिकेला दिलासा दिल्याबद्दल खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत. या उपलब्ध निधीमुळे मोठागाव येथील रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाला गती मिळणार असून कल्याण रिंग रोड प्रकल्पाच्या कामालाही बळकटी मिळणार आहे. येत्या काही दिवसात हा मार्ग पूर्णत्वास आल्यास या भागाचे महत्व वाढण्यास मदत होणार आहे.

## मुंबईतील उद्धवस्त झालेल्या गिरणी कामगारांना घरे कधी मिळणार?

**ठाणे :** मुंबईतील उध्दवस्त झालेल्या गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यात यावा अशी मागणी **माझा बाप उद्धवस्त गिरणी कामगार** या पुस्तकाचे लेखक अर्जुन विष्णू जाधव यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली.

१९८२ साली गिरणी कामगाराचा संप झाला अनेक गिरणी कामगार उद्धवस्त झाले. या गिरणी कामगारांना महाराष्ट्र सरकार मुंबईत हक्काची घरे देणार अशी घोषणा झाली. काही हातावरील बोटावर मोजण्याइतक्या गिरणी कामगारांना मुंबई स्थित घरे मिळाली आहेत. तर लाखो गिरणी कामगार आपल्या हक्काच्या घराच्या प्रतिक्षेत आहेत. काही गिरणी कामगार हक्काच्या घराचं स्वप्न पाहत झुरून झुरून मरून गेले आहेत. त्यांचे वारसदार घरासाठी धडपडत आहेत.

काही गिरणी कामगारांची मुले साहित्यिक, पत्रकार, कलावंत, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असून त्यांना आपल्या वडिलांच्या हक्काच्या घरांची अत्यंत गरज आहे.गिरणी कामगार हे पश्चिम महाराष्ट्र,मराठावाडा,कोकण, खानदेश, विदर्भ अर्थात महाराष्ट्रातील जास्त आहेत. मुंबईत मराठी माणसाची जाणीव ठेवून व संयुक्त महाराष्ट्राची अस्मिता मनात बाळगून आपण स्वतः जातीने लक्ष घालून भिजत पडलेल्या गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा .आपण अनेक वेळा भाषणातून म्हटला आहात, गिरणी कामगारांना वार्यावर सोडणार नाही आणि मुंबईतील मराठी टक्का कमी होऊ देणार नाही. यांचे स्मरण करून गिरणी कामगारांना हक्काचं घर मुंबईत देण्यात यावं अशी मागणी साहित्यिक अर्जुन विष्णू जाधव यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

## सरस्वती सेकंडरी व्हाया सिग्नल शाळा आशेचा 'किरण'




**दहावीत ६० टक्यांनी उत्तीर्ण**

**ठाणे:** ठाणे शहरातील विविध सिग्नलवर असलेल्या पुर्वाश्रमीच्या भीक्षेकरी मुलांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या सिग्नल शाळेचा विद्यार्थी किरण काळे दहावीची परिक्षा ६० टक्यांनी उत्तीर्ण झाला. वडील नसलेला किरण काळे आठ वर्षांचा असतांना सिग्नल शाळेत दाखल होता.

ठाणे महानगरपालिका आणि समर्थ भारत व्यासपीठ संस्थेच्या माध्यमातुन चालवल्या जात असलेल्या सिग्नल शाळेतील किरण काळे हा विदयार्थी ६० टक्के गुण मिळवत दहावी उत्तीर्ण झाला. तीन हात नाक्याखाली वडील नसलेला किरण आपल्या आई सोबत निर्वासित आयुष्य जगत होता. सिग्नल शाळेमुळे वयाच्या आठव्यावर्षी त्याला शाळेचे विश्व गवसले. सिग्नल शाळेत थेट तिसरीत दाखल झालेल्या किरणने आपल्यातील शैक्षणिक अनुशेष भरून काढत अभ्यासात चांगली प्रगती केली. त्याची ही प्रगती पाहुन संस्थेने त्याला सरस्वती सेकंडरी शाळेत प्रवेश दिला. तेथे देखील त्याने चांगले यश संपादन केली व आज दहावीच्या निकालात ६० टक्यांनी उत्तीर्ण होत तो रस्त्यावरील मुलांसाठी आशेचा किरण ठरला.

किरणची आई मीना काळे ही निरक्षर असुन गोखले रोडवर गजरे विकण्याचा व्यवसाय करते. किरण पुढील शिक्षण घेऊन आईसाठी एक घर घ्यायचे आहे.

सिग्नल शाळेच्या प्रकल्प प्रमुख आरती परब व शिक्षिका शैला देसले, सरला पाटोळे, पोर्णिमा करंदीकर, समिधा इनामदार, प्रीया जाधव आदी शिक्षकांचा किरणच्या यशात विशेष योगदान आहे.

# परिवहन बसेसच्या मार्गाचे सर्वेक्षण करुन जलद व सुखकर सेवा देण्यासाठी प्रयत्न करावेत



## महापालिका आयुक्त अभिजीत बांगर

## आयुक्तांनी घेतला परिवहनच्या कामकाजाचा आढावा

**ठाणे:** ठाण्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी ठाणे महापालिकेच्या माध्यमातून नवनवीन उपक्रम व नागरी कामे हाती घेण्यात आले आहे. प्रामुख्याने मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे अभियानातंर्गत सुरू कामे सुरू आहेत. याच धर्तीवर ठाणे परिवहन सेवा अधिक सक्षम करुन आवश्यकतेनुसार बदल करुन प्रवाशांना जलद व सुखकर सेवा मिळेल या दृष्टीने परिवहन सेवेचा आढावा गुरुवारी पार पडलेल्या बैठकीत आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतला. तसेच नव्याने उपलब्ध होणाऱ्या इलेक्ट्रिक बसेसच्या पुरवठा कामात विलंब होत असल्याबाबत संबंधित ठेकेदारास नोटीस बजावण्याचे निर्देश दिले.

परिवहन सेवा ठाणेकरांची जीवनवाहिनी आहे, ही बससेवा केवळ ठाणे शहरापुरतीच मर्यादित न राहता बोरिवली, मीरारोड, भिवंडी, मुलुंड, कल्याण आदी भागात पोहचली आहे. तसेच आरामदायी प्रवासासाठी परिवहनच्या ताफ्यात वातानुकूलित बसेस देखील धावत आहेत. परिवहन सेवेच्या माध्यमातून सद्यस्थितीत सुरू असलेले मार्गावरील बसफेऱ्यांची माहिती आज झालेल्या बैठकीत आयुक्तांनी जाणून घेतली. ज्या मार्गावर बसेस धावत आहेत त्याचा संपूर्ण आढावा घेवून गर्दीच्या वेळी जास्तीत जास्त उपलब्ध होवून प्रवाशांचा खोळंबा होणार नाही व प्रवाशी परिवहनच्या बसेसला प्राधान्य देतील या दृष्टीने संपूर्ण सर्व्हेक्षण करुन आवश्यक ते बदल व उपाययोजना करण्याबाबतच्या सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

पर्यावरणपूरक म्हणून परिवहन सेवेने इलेक्ट्रिक बसेस घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला असून सदर कामाचा ठेका ओलेक्ट्रा या कंपनीस देण्यात आला आहे. यामध्ये एकूण १२३ बसेसचा समावेश असून आजवर केवळ १३ बसेस परिवहनच्या ताफ्यात दाखल झालेल्या आहेत. परंतु उर्वरित एकूण ११० बसेस पुरवठ्याबाबत संबंधित ठेकेदारांकडून विलंब होत असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त संबंधित ठेकेदारास करारनाम्याप्रमाणे दंड लावण्यात यावा, तसेच त्यानंतरही वेळेत बसेसचा पुरवठा केला नाही तर भविष्यातील निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यापासून प्रतिबंधित का करु नये याचा खुलासा मागवून घ्यावा व आवश्यकता पडल्यास ही कार्यवाही कायम करावी अशा सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या. तसेच परिवहनमार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजना व बदलाबाबत वेगवेगळ्या ठिकाणी प्रवाशांची मते जाणून घ्यावीत जेणेकरुन त्यांच्याकडून येणाऱ्या सुचनांनुसार आपल्याला कोणते बदल करणे गरजेचे आहे हे समजू शकेल व त्याप्रमाणे आपण बदल करु असेही त्यांनी या बैठकीत नमूद केले.

बसेसच्या माध्यमातून जाहिरात करण्यासाठी ११ वेळा निविदा मागवून देखील योग्य प्रतिसाद मिळाला नाही ही बाब अत्यंत खेदजनक आहे तरी याबाबत एनएमएमटी, बी.एस.टी यांच्या जाहिरातदारांशी तुलना करुन दर निश्चित करावेत व निविदा अधिक स्पर्धात्मक होईल अशा पध्दतीने अटी शर्थींमध्ये बदल करावा जेणेकरुन निविदा यशस्वी होवू शकेल अशाही सूचना या बैठकीत देण्यात आल्या. महापालिकेच्या आस्थापनेवर परिवहनकडून ज्या ५६ चालकांची सेवा वर्ग करण्यात आली आहे, अशा वाहनचालकांची सेवा टप्याटप्याने पुन्हा परिवहन सेवेत दाखल करुन घ्यावे असेही निर्देश आयुक्त बांगर यांनी दिले.

परिवहन सेवेत काम करताना दोन प्रमुख उद्देश डोळ्यासमोर ठेवणे गरजेचे आहे.परिवहन सेवेत अशा पध्दतीने सुधारणा कराव्यात की नागरिकांना सुखद अनुभव प्राप्त होईल. तसेच परिवहन उपक्रमातील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीकोनातूनही सकारात्मक कार्यवाही होईल या दृष्टीने कामकाज करण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या.

घोडबंदररोड सारखे लांबपल्ल्याचे व गर्दीचे मार्ग या ठिकाणी बसेसच्या फेऱ्या वाढवाव्यात त्याचबरोबर नवीन येणाऱ्या इलेक्ट्रिक बसेस प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात. परिवहन सेवा वापरणाऱ्या महिला व ज्येष्ठ नागरिक यांच्याकडून त्यांना येणाऱ्या अडचणी व उपक्रमाकडील त्यांच्या अपेक्षा याबाबत फीडबॅक घेवून त्यांच्या सूचनांचा अंतर्भाव आपल्या सेवेत होईल याची दक्षता घ्यावी. महिलांना परिवहन सेवेचा लाभ विनासायास घेता येईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

या बैठकीस परिवहन व्यवस्थापक विलास जोशी, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे आदी उपस्थित होते.

# रूग्णालय प्रशासन व ठेकेदाराच्या संगनमताला कंटाळून मनोरूग्णालयातील सफाई सेवक बेमुदत संपाच्या पावित्र्यात

**ठाणे :** ठाणे प्रादेशिक मनोरूग्णालयातील सफाई सेवकांचे होणारे शोषण थांबवून, कामगारांना कायदेशीर वेतन, भत्ते आणि कायदेशीर सुविधा मागील फरकासह अदा न केल्यास बेमुदत आंदोलन करण्याबाबत रूग्णालय प्रशासनाला सफाई कामगारानी लेखी नोटीस बजावली आहे. वारंवार कामगारांनी व श्रमिक जनता संघ युनियनने अर्ज विनंत्या व निवेदने करून ही कामगारांच्या कायदेशीर व न्याय्य मागण्यांकडे रूग्णालय प्रशासन आणि संबंधित ठेकेदारानी दुर्लक्ष करून गेले सुमारे चार वर्षे सफाई कामगारांचे शोषण सुरू ठेवले आहे. शेवटी रूग्णालय प्रशासन व ठेकेदार यांच्या संगनमताला कंटाळून कामगारांनी सर्वानुमते बेमुदत आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

गेल्या चार वर्षात कामगारांना कायदेशीर वेतन अदा केलेले नाही. दर सहा महिन्यानी वाढणाऱ्या विशेष भत्याची रक्कम पगारात दिलेली नाही. कामगारांना सुरक्षा साहित्य म्हणून रेनकोट, छत्री, गमबूट, साबण, टावेल मास्क, हैंडग्लोब्ज आदी कधीही पुरविले नाहीत. येत्या १४ दिवसांत कामगारांच्या युनियनचे शिष्टमंडळा बरोबर चर्चा करून न्याय दिला नाही तर १४ दिवसानंतर सफाई कामगारांनी काही आंदोलन केल्यास त्यासाठी संबंधित ठेकेदार व रूग्णालय प्रशासन जबाबदार राहील. असे नोटीसमध्ये म्हटले आहे. कामगारांना विहित वेळेत वेतन नाही, पगाराची पावती, हजेरी कार्ड पुरवली नाहीत, कंत्राटी कामगार कायदा आणि किमान वेतन कायद्यानुसार पगाराचे दर व अन्य कायदेशीर सोयी सुविधा बाबत दर्शनी ठिकाणी कामगारांच्या माहिती साठी लावणे आवश्यक असतांना ठेकेदारानी ते नियम पायदळी तुडविले आहेत. इतकेच नाही तर ठेकेदारानी सफाई कामगारांना भरपगारी रजा किंवा रजेचे वेतन अदा करण्यात आलेले नाही.

साफसफाईचे काम हे सफाई कामगारांच्या आरोग्यावर दुष्परिणाम करणारे आहे. त्यामुळे विविध विविध आजाराला सफाई कामगार बळी पडू नये म्हणून वैद्यकीय सुरक्षा देण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेचा लाभ मिळवून देणे किंवा कैशलेस मेडिक्लेम योजना लागू करणे बंधनकारक आहे. मात्र सदर ठेकेदार कामगारांच्या वेतनातून ची रक्कम कपात करून देखील ती कार्यालयात पूर्णपणे व वेळेवर भरत नाही. त्यामुळे अनेक कामगारांना वैद्यकीय लाभ किंवा वैद्यकीय रजेचा लाभ मिळण्यासाठी अडचणी येत आहेत.

युनियनच्या तक्रारी वरून कामगार उप आयुक्त कार्यालय, ठाणे मार्फत १७ फेब्रुवारी २०२३ रोजी रूग्णालयात इंस्पेक्शन केल्यानंतर सदर ठेकेदार मे. लोकराज्य स्वयंरोजगार सहकारी सेवा संस्था विरोधात विविध कामगार कायद्यांचे उलंघन केल्या प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. इतके सगळे होऊनही रूग्णालय प्रशासन मात्र ठेकेदाराला पाठीशी घालत आहे, ही टेबलाखालची दोस्ती असल्याचा आरोप युनियनचे सरचिटणीस जगदीश खैरालिया यांनी केला आहे.येत्या १४ दिवसांत कामगारांच्या युनियनचे शिष्टमंडळा बरोबर चर्चा करून न्याय दिला नाही. तर सफाई कामगारांनी काही आंदोलन केल्यास त्यासाठी संबंधित ठेकेदार व रूग्णालय प्रशासन जबाबदार राहील. असा इशारा ही त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ५ जून २०२३


# अखेर दिव्यात मनसेच्या प्रयत्नांनंतर २७ तासांनी 'त्या' चाळींची लाईट पुन्हा आली

**दिवा : गणेश पाड्यातील रहिवाशी महादेव मिसाळ यांचा कॉल आला. महादेवजी जनार्धन चाळ, गणेश पाड्यात राहायला असून त्यांच्या चाळीतील चाळ क्रमांक १,२,३,४ आणि ५ या सर्व चाळींचा वीजपुरवठा काल दिनांक १ जून रोजी १२.३० वाजता खंडित झाला. त्यानंतर साधारण १.३० वाजता टोरेंट पॉवर च्या कॉल सेंटरमध्ये फोन करून त्यांनी आपली तक्रार नोंदवली. साधारणपणे ४.३० वाजता टोरेंट पॉवर कडून दुरुस्ती साठी टिम पाठवली जाईल असे सांगण्यात आले.**



**दिवा** : गणेश पाड्यातील रहिवाशी महादेव मिसाळ यांचा कॉल आला. महादेवजी जनार्धन चाळ, गणेश पाड्यात राहायला असून त्यांच्या चाळीतील चाळ क्रमांक १,२,३,४ आणि ५ या सर्व चाळींचा वीजपुरवठा काल दिनांक १ जून रोजी १२.३० वाजता खंडित झाला. त्यानंतर साधारण १.३० वाजता टोरेंट पॉवर च्या कॉल सेंटरमध्ये फोन करून त्यांनी आपली तक्रार नोंदवली. साधारणपणे ४.३० वाजता टोरेंट पॉवर कडून दुरुस्ती साठी टिम पाठवली जाईल असे सांगण्यात आले.

रात्री ११.०० वाजता सांगण्यात आले की १२.०० वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरळीत होईल. पण त्यानंतर टोरेंट पॉवर प्रशासनाकडून रात्री कुठलीही टिम तिथे आली नाही आणि काम आता उद्या सकाळीच होईल अशी उडवाउडवीची उत्तरे लोकांना देण्यात आली. दरम्यानच्या काळात विविध लोकांशी (राजकीय) संपर्क साधून वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत पाठपुरावा केला पण त्यांना प्रतिसाद मिळाला नाही.

अखेर सकाळी ११.३० वाजेपर्यंत टोरेंट पॉवर कडून कोणीही तिथे न आल्याने त्यांनी त्यांचे मित्र आनंदा पाटील यांच्याशी संपर्क साधला. आनंदा पाटील यांनी दिवा मनसेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा त्यांना सल्ला दिला आणि माझा नंबर त्यांना दिला. त्यांच्याशी बोलून त्यांची सर्व माहिती घेऊन आम्ही टोरेंट पॉवर च्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. वास्तविक पाहता विद्युत अधिनियम २००३ नुसार शहरी भागातील केबल फौल्ट हा तक्रार केल्यापासून पुढच्या ८ तासात सुरू होणे हे आवश्यक आहे याची जाणीव त्यांना करून दिल्यानंतर तात्काळ टोरेंट पॉवर प्रशासनाने टिम पाठवण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर तात्काळ गणेश पाड्यातील मनसेचे ※उपविभाग अध्यक्ष सुशांत तांडेल आणि शाखाध्यक्ष धनेश पाटील※ यांनी स्वतः उभं राहून हा वीजपुरवठा सुरळीत करून घेतला.

*या प्रचंड उकड्यात लोकांना २७ तास विजेशीवाय राहावं लागलं हे निश्चितच उद्विग्न करणारे आहे विशेषत: जेव्हा आता खाजगी कंपनी देखभालीचे काम करतेय. कालचं वेळेवर याची माहिती मिळाली असती तर कदाचित वीजपुरवठा याआधी सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करता आले असते हे मात्र नक्की..!*

*– प्रशांत प्रभाकर गावडे*
*सचिव – दिवा शहर※*
*महाराष्ट्र नवनिर्माण सेना*

# रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या दिव्यातील नागरिकांना तातडीने घर उपलब्ध करून द्या

## दिवा भाजपची मागणी

**दिवा:–** दिवा विभागातील टाटा रोड बी आर नगर येथील रस्ता रुंदीकरणाचे काम चालू असून तेथील लोकांचे पुनर्वसन झाले पाहिजे अशी प्रमुख भूमिका दिवा भाजपने दिवा प्रभाग समिती मध्ये मांडली होती. त्यानुसार तेथील लोकांचं बायोमेट्रिक पद्धतीने सर्वे ही झाले होते.त्यानंतर त्यांचं पुनर्वसन होईल व त्यांना रूमच्या चाव्या देण्यात येतील असे दिवा प्रभाग समितीतून सांगण्यात आले होते. परंतु अचानक येथील रूमवर तोडक कारवाई करून तेथील रहिवाशांना बेघर करण्यात आलं आहे. या संदर्भात तातडीने रोहिदास मुंडे यांनी जिल्हाध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांची भेट घेऊन ठाणे महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांची मुख्यालय भेट घेऊन या संदर्भात आयुक्तांना याची माहिती दिली. त्यानंतर आमदार निरंजन डावखरे यांनी आयुक्तांना सांगितले की पहिले लोकांचे पुनर्वसन करा, त्यानंतरच कारवाई करा. पावसाळा जवळ आहे. लोक बेघर होतील,त्यांचं प्रथम पुनर्वसन करा आणि मगच कारवाई करा असे आमदार निरंजन डावखरे यांनी आयुक्तांशी चर्चेत म्हटले आहे.

# केंद्र शासनाच्या पथकाने केली जलशक्ती अभियानाच्या जिल्ह्यातील कामांची पाहणी

**ठाणे :** केंद्र शासनाच्या जलशक्ती अभियान –कॅच दी रेन अंतर्गत जिल्ह्यातील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या जलसंधारणाच्या कामांची पाहणी केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या सदस्य तथा या अभियानाच्या नोडल अधिकारी जागृती सिंगला यांनी गुरुवारी केली.

केंद्र शासनाच्या जलशक्ती अभियानाच्या अंमलबजावणीची माहिती घेण्यासाठी निती आयोगाच्या सदस्या तथा नोडल अधिकारी सिंगला या ठाणे जिल्हा दौऱ्यावर आल्या होत्या. यासंदर्भात त्यांनी बुधवारी जिल्ह्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणेची आढावा बैठक घेतली. आज त्यांनी जिल्ह्यातील अधिकाऱ्यांसमवेत भिवंडी तालुक्यातील कोनगाव, खलिंग बु., कुंभारशिव गावांतील विविध कामांची पाहणी केली.

जिल्हा परिषदेचे लघु पाटबंधारे विभागाकडून अमृत सरोवर अंतर्गत करण्यात आलेल्या गाळ काढणे, बंधारे इत्यादी कामांचा तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत आदिवासी विकास कार्यक्रम अंतर्गत करण्यात आलेल्या डीप ऍक्वेफेर (खोल भूस्तर) पुर्नभरण कामांची पाहणी केली.

तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभागा मार्फत राबविण्यात आलेल्या बोअरवेलद्वारे छतावरील पावसाचे पाणी संकलन या योजनेची त्यांनी विशेष प्रशंसा केली. अशा प्रकारची जास्तीत जास्त कामे घेऊन भूजलस्तर वाढविण्यात यावे, अशा सूचना केल्या. या योजने बाबत पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अर्जुन गोळे व उप अभियंता (यांत्रिकी) संजय सुकटे यांनी माहिती दिली.